**नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था (SIDM) स्थापन करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसूल व वन विभाग**

**(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)**

**शासन निर्णय क्रमांकः आव्यप्र-२०२०/प्र.क्र.१४०/आव्यप्र-१**

महसूल व वन विभाग, मादामा कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
१ ला मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- २२ एप्रिल, २०२५

**वाचा**

१) दि. २९.०५.२०२३ रोजी आयोजित राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक.
२) दि.०५.१२.२०२३ रोजी आयोजित राज्य कार्यकारी समितीची बैठक
३) दि.१९.१२.२०२३ रोजी आयोजित राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाची बैठक
४) शासन निर्णय महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) क्रमांक आव्यप्र-२०२०/प्र.क्र.१४०/आव्यप्र-१ दिनांक ३१.०३.२०२२
५) शासन निर्णय महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) क्रमांक आव्यप्र-२०२४/प्र.क्र.७१/आव्यप्र-१ दिनांक २३.०९.२०२४
६) शासन निर्णय महसूल व वन विभाग (आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन) क्रमांक आव्यप्र-२०२०/प्र.क्र.१४०/आव्यप्र-१ दिनांक ०१.०७.२०२४

**प्रस्तावना**

भौगोलिक संरचनेनुसार महाराष्ट्र हे आपत्ती प्रवण क्षेत्रात मोडणारे राज्य आहे. राज्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना सक्षमपणे प्रतिसाद देण्यासाठी आपत्ती पूर्व तयारी, सौम्यीकरण, आपत्ती प्रवणता, धोका, आपत्ती नंतर मदत, पुनर्वसन, पुनर्बांधनी, प्रतिसाद, प्रशिक्षण, पूर्ण अवस्था (Build-Back-Better) ह्या बाबींचे व्यवस्थापन व नियोजन करून सांगड घालण्याकरीता केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था (NIDM) च्या धर्तीवर राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था (State Institute of Disaster Management) (SIDM) स्थापन करणे आवश्यक आहे.

आपत्तीचे बदलणारे स्वरूप, आपत्तींचे संपूर्ण जनमाणसांवर होणारे आर्थिक, सामाजिक आणि आरोग्य विषयक परिणाम लक्षात घेता, आपत्तीचे व्यवस्थापन व नियंत्रण मानवी जीवनाचा अविभाज्य भाग झाला आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी विविध क्षेत्रातील संबंधित प्रशिक्षित मनुष्यबळाची आगामी काळात अधिक गरज भासणार असून त्याकरिता आपत्ती व्यवस्थापनासाठी निवासी प्रशिक्षणाची आवश्यकता असणार आहे. या सर्व बाबींचा विचार करून सर्व प्रकारच्या आपत्तींचे नियोजन, व्यवस्थापन व विश्लेषण करण्यासाठी आवश्यक पायाभूत सुविधा, मनुष्यबळ व तंत्रज्ञान उपलब्ध होण्यासाठी राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेची स्थापना करणे गरजेचे आहे.

उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना सक्षम प्रतिसाद देण्यासाठी राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या (NIDM) धर्तीवर राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था (SIDM) स्थापन करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय

भौगोलिक संरचनेनुसार महाराष्ट्र हे आपत्ती प्रवण क्षेत्रात मोडणारे राज्य असल्याने राज्यात उद्भवणाऱ्या नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तींना सक्षमपणे प्रतिसाद देण्यासाठी आपत्ती पूर्व तयारी, सौम्यीकरण, आपत्ती प्रवणता, धोका, आपत्ती नंतर मदत, पुनर्वसन, पुनर्बांधनी, प्रतिसाद, प्रशिक्षण, पूर्ण अवस्था (Build-Back-Better) ह्या बाबींचे व्यवस्थापन व नियोजन करून सांगड घालण्याकरीता केंद्र शासनाच्या राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन संस्था (NIDM) च्या धर्तीवर नागपूर येथे राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्था (State Institute of Disaster Management) (SIDM) स्थापन करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

०२. **संस्थेसाठी नियमन व्यवस्था:-**

राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेबाबत सर्व निर्णय घेण्यासाठी शिखर यंत्रणा म्हणून मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्य कार्यकारी समिती ही नियामक समिती (Governing Council) म्हणून कार्य करेल.

क्षमता बांधणी, संशोधन, धोरण निश्चिती करणे इत्यादी बाबी हाताळण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यकारी समिती (Executive Committee) गठीत करण्यात येत आहे.

| | |
|---|---|
| अपर मुख्य सचिव /प्रधान सचिव / सचिव (आ.व्य. म.व पु.) | पदसिध्द अध्यक्ष |
| संचालक (आपत्ती व्यवस्थापन प्रभाग) | सदस्य |
| आयआयटी, मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| आयआयएम, नागपूर यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| जमशेटजी टाटा स्कूल फॉर डिझास्टर स्टडीज यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| अग्निशमन सेवा संचालनालयाचे प्रतिनिधी | सदस्य |
| कार्यकारी संचालक (एसआयडीएम) | सदस्य सचिव |
| पूर, दुष्काळ, सीबीआरएन, भूस्खलन, भूकंप, त्सुनामी, हवामानशास्त्र, वातावरणीय बदल या विषयातील तसेच राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल आणि राज्य आपत्ती प्रतिसाद दल यांचे प्रतिनिधी | आवश्यकतेनुसार किमान ५ प्रतिनिधी आमंत्रित |

०३. राज्य आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या खालील संरचणेस तत्वत: मान्यता देण्यात येत आहे:-

१. आपत्ती-जोखीम नुसार (Hazard, risk specific) तांत्रिक विभाग आणि आधुनिक प्रयोगशाळा कार्यान्वीत करणे.
२. प्रशासन आणि संचालन विभाग
३. वित्त विभाग

**आपत्ती- जोखीम नुसार (Hazard, risk specific) गरजेप्रमाणे भविष्यात यामध्ये वाढ करण्यात येईल.**

०४. सदर संस्थेसाठी महाराष्ट्र विमानतळ विकास प्राधिकरण, नागपूर (मिहान) येथे १० एकर जागा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

०५. सदर संस्थेच्या इमारत बांधकामासाठी अंदाजे रु.१८४.९४ कोटी इतका खर्च राज्य निधीमधून करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

०६. सदर संस्थेसाठी कामाच्या स्वरुपानुसार आवश्यक असणारी संवर्गनिहाय नियमित व कंत्राटी/पदे तसेच तांत्रिक सल्लागार इत्यादी मनुष्यबळ आवश्यकतेनुसार वित्त विभागाच्या मान्यतेने निर्माण करण्यास व त्यावरील खर्चास मान्यता देण्यात येत आहे.

०७. सदर संस्थेच्या इमारत बांधकामासाठी अंमलबजावणी यंत्रणा म्हणून (Project Implementation Agency) महाराष्ट्र मेट्रो रेल कार्पोरेशन लिमिटेड (महा-मेट्रो) या सार्वजनिक उपक्रमाच्या नियुक्तीस मान्यता देण्यात येत आहे.

०८. सदर संस्थेकरीता आपत्ती प्रतिसाद व प्रशिक्षणाशी संबंधीत यंत्र व साधनसामग्रीकरीता होणारा खर्च हा **"पूर्व तयारी व क्षमता बांधणी** (Preparedness and Capacity Building )" या योजनेंतर्गत वित्त आयोगांतर्गत उपलब्ध निधीतून राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मानकानुसार करण्यात येईल. सदर खर्च मागणी क्र.सी-६, प्रधानशिर्ष २२४५, राज्य आपत्ती प्रतिसाद निधीच्या मानकानुसार खर्च, (९१) (०१), पूर्व तयारी व क्षमता बांधणी (२२४५ ४१८८) अंतर्गत ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या उद्दिष्टाखाली उपलब्ध तरतुदीतून भागविण्यात येईल.

०९. सदर संस्थेच्या इमारत बांधकामासाठी होणारा अंदाजे खर्च मागणी क्र.सी-६, २२४५, नैसर्गिक आपत्तींच्या निवारणासाठी सहाय्य, ८०-सर्वसाधारण (०१)(०१), महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे कार्यालय स्थापन करणे व फर्निचर व साधनसामग्रीसह सुसज्जीकरण करणे (२२४५ १७६१) ३१-सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली मंजूर तरतूदीतून भागविण्यात येईल.

१०. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२५०४२२१८३७१८१३१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SONIA
SANJAY SETHI

Digitally signed by SONIA SANJAY SETHI
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT,
2.5.4.20=8641dd099e81cad626c01e8e7acdacb4bffe158a8927e9a6db3771bab4dca7c4, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=A9760822538F3B1FB713BDB2EDAB713B5B5ECBE7332E4AD495EC6A13F08446DD, cn=SONIA SANJAY SETHI
Date: 2025.04.23 11:43:19 +05'30'

**( डॉ. सोनिया सेठी )**
**अपर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

२. मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास/वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

३. मा. सभापती/उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
४. मा. अध्यक्ष/उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
५. मा. मंत्री (आपत्ती व्यवस्थापन) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद/विधानसभा, यांचे खाजगी सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७. मा. मुख्य सचिव, यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
८. सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक
९. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई.
१०.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर.
११.महालेखापाल (लेखापरीक्षा), मुंबई/ नागपूर.
१२.संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
१३.सह सचिव तथा वित्तीय सल्लागार, (आ.व्य.,म.व पु.वि.) मंत्रालय, मुंबई.
१४.लेखाधिकारी (आव्यप्र-६), आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
१५.निवडनस्ती, आव्यप्र-१.